# ZENITH FIBRES LIMITED

ISO 9001:2015 COMPANY

103 "Synergy House", Subhanpura Road, Vadodara - 390 023, Gujarat, (India) CIN : L40100MH1989PLC054580
Tele No. : +91-265-228-3744 Tele/Fax : +91-265-228-3743 E-mail : baroda@zenithfibres.com URL : www.zenithfibres.com

28th June, 2021

To
The Manager,
BSE Limited,
Corporate Relations Dept.,
Dalal Street,
Mumbai 400 001.

Dear Sir,

**Sub: audited financial results**

**Scrip Code No: 514266**

**Intimation under Regulation 30 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015**

Pursuant to Regulation 30 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we enclose herewith a copy of audited financial results published in English and vernacular language (Marathi) newspapers. We request you to please take the same on record.

Thanking you,

**For Zenith Fibres Limited**

Siddhi Shah
Company Secretary






## निवडक

### मुंबईतील ताज हॉटेलमध्ये बंदूक घेऊन दोन व्यक्ती घुसल्याच्या अफवेने दहशतीचं वातावरण

**मुंबई, दि. २६ ( प्रतिनिधी ) :** मुंबईतील मंत्रालयात काही दिवसांपूर्वी बॉम्ब ठेवल्याच्या अफवा उडाली होती. त्यानंतर आता कुलाब्यातील ताज हॉटेलमध्ये दोन मास्कधारी व्यक्ती बंदुकीसह घुसले असल्याच्या फोनने दहशतीचं वातावरण निर्माण झालं होतं. फोननंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आणि घटनास्थळाची पाहणी करण्यास पोहोचल्या आहे. मुंबई पोलिसांचे बॉम्बशोधक आणि नाशक पथकाकडून घटनास्थळाची पाहाणी केली गेली. त्यानंतर ही अफवा असल्याचं समोर आलं आहे.

मुंबई पोलिसांनी तपासाची सूत्रं वेगाने फिरवत हा फोन कुठून आला, याचा शोध लावला. त्यानंतर एका १४ वर्षीय मुलांने हा फोन केल्याचं समोर आलं आहे. चौकशीअंती हा फोन कॉल खोटा असल्याचं स्पष्ट झालं आहे. या प्रकरणी पोलिसांनी १४ वर्षीय मुलाला ताब्यात घेतलं आहे. या घटनेबाबत त्याच्या वडिलांना काहीच माहित नसल्याचं समोर आलं आहे. मुंबई पोलिस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

अफवा जरी असली तरी फोननंतर पोलिसांनी तात्काळ हालचाली करत संपूर्ण परिसर निर्मनुष्य केला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी काळजी घेतली गेली. तसेच ताज हॉटेलच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.

पान १ वरून

### यांना त्यांच्या बायकोनं जरी मारलं, तरी मोदींना जबाबदार धरतील

हे दोघे जणं पहिल्यांदा नागपूरच्या उच्च न्यायालयात गेले, त्यावेळी आमचं सरकार होतं. त्यावेळी मी चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सूत्रं दिली. ग्रामविकास खातं पंकजा मुंडे यांच्याकडे होतं. तिकडे राम शिंदे होते. आमचे संजय कुठे होते? या सगळ्यांना एकत्रितपणे बसवलं. मी त्यांना सांगितलं हे मोठं सगळं षडयंत्र आहे, जे आपल्याला हाणून पाडलं पाहिजे. मी बावनकुळेंचं अभिनंदन करेल, सरकारच्या वतीने ही केस चंद्रशेखर बावनकुळे लढले आणि नागपूरमध्ये उच्च न्यायालयाने आपल्या सरकारच्या बाजूने निर्णय दिला,' असं फडणवीस म्हणाले.

### बनावट लस घेतल्यानंतर टीएमसी खासदार मिमी चक्रवर्ती यांची प्रकृती बिघडली

अधिकारी असल्याची बतावणी करून मिमीला फसवणाऱ्या देबांजन देब नावाच्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. टीएमसीचे खासदार मिमी म्हणाल्या, 'एका व्यक्तीने मला आयएएस अधिकारी सांगत तो ट्रान्सजेंडर्स आणि दिव्यांग व्यक्तींसाठी एक विशेष लसीकरण मोहीम चालवित असल्याचे सांगितले. या बरोबर त्या व्यक्तीने मला लसीकरण शिबिरात येण्याची विनंती केली. लोकांचे मनोबल वाढविण्यासाठी मला कोविशिल्डची लस देखील देण्यात आली. पण को-विन ॲपवर मला लस घेतल्याचा मेसेज आला नव्हता. त्यानंतर मी कोलकाता पोलिसात तक्रार केली. दरम्यान, आरोपीला अटक करण्यात आली.' गेल्या सहा दिवसात कसबा केंद्रात किमान २५० जणांना लस टोचण्यात आली आहे, असे पोलिसांचे म्हणणे आहे. आरोपी देबांजन देब याने उत्तर व मध्य कोलकाता येथे बनावट लसीकरण शिबिरांचे आयोजन केले होते. यातील एक उत्तर कोलकाता येथील सिटी कॉलेजमध्ये आणि ३ जून रोजी सोनारपूर येथे एक शिबिराचे आयोजन केली होते. चौकशी दरम्यान देब याने पोलिसांना सांगितले की, त्याने लस बगडी मार्केट व स्वास्थ्य भवनाबाहेरून घेतली होती.

### राष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे ट्रॅफिकमध्ये अडकल्याने रुग्णालयात जाणाऱ्या महिलेचा मृत्यू

कानपूर पोलिस आयुक्तालयाच्या अधिकृत ट्विटर हँडलने मिश्रा यांच्या मृत्यूबद्दल दिलगिरी व्यक्त केली. 'राष्ट्रपती, बहीण वंदना मिश्रा यांच्या अकाली निधनामुळे अस्वस्थ झाले आहेत. त्यांनी पोलिस आयुक्तांना व जिल्हा दंडाधिकाऱ्यांना बोलावून माहिती घेतली आणि शोकग्रस्त कुटुंबापर्यंत आपला संदेश पोहचविण्यास सांगितले. दोन्ही अधिकारी अंत्यसंस्कारात हजर झाले आणि शोकसंतप्त कुटुंबाला राष्ट्रपतींचा संदेश दिला' असं ट्विटमध्ये म्हटलं आहे. तसेच नागरिकांना सुरक्षिततेसाठी कोणतीही अडचण येऊ नये, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत मुळीच नाही. अशी पुनरावृत्ती होऊ नये म्हणून यंत्रणेत सुधारणा करण्यासाठी पावले उचलली जात आहेत, असंही म्हटलं आहे.

कानपूर पोलिस आयुक्तालयाच्या अधिकृत ट्विटर हँडलने मिश्रा यांच्या मृत्यूबद्दल दिलगिरी व्यक्त केली. 'महामहिम राष्ट्रपती, बहीण वंदना मिश्रा यांच्या अकाली निधनामुळे अस्वस्थ झाले आहेत. त्यांनी पोलिस आयुक्तांना व जिल्हा दंडाधिकाऱ्यांना बोलावून माहिती घेतली आणि शोकग्रस्त कुटुंबापर्यंत आपला संदेश पोहचविण्यास सांगितले. दोन्ही अधिकारी अंत्यसंस्कारात हजर झाले आणि शोकसंतप्त कुटुंबाला राष्ट्रपतींचा संदेश दिला,'असे ट्विटमध्ये म्हटले आहे.

### डेल्टा विषाणू हा कोरोनाचा सर्वाधिक संक्रमण होणारा प्रकार

आजपर्यंत सापडलेल्या कोरोना व्हेरिएंटमध्ये हा प्रकार सर्वाधिक वेगाने संक्रमण होणारा प्रकार आहे. आपण सगळ्यांनी सार्वजनिक आरोग्य आणि कोरोनासंदर्भातल्या नियमांचं काटेकोरपणे पालन करणं आवश्यक आहे. त्यासोबतच या विषाणूला थांबवायचं असल्यास जगातल्या सर्वच देशांमध्ये समान पद्धतीने लसींचा पुरवठा व्हायला हवा', असं टेड्रॉस यावेळी म्हणाले.


दरम्यान, यावेळी डॉ. टेड्रॉस यांनी कोरोनाच्या नवनवीन व्हेरिएंटला आवर घालण्यासं सूत्र दिलं. जेवढं या विषाणूचं संक्रमण आपण कमी करू, तेवढे त्याचे व्हेरिएंट कमी असतील, असं ते म्हणाले. त्यासाठी व्यापक लसीकरणाची गरज त्यांनी व्यक्त केली. हे लसीकरण जगातल्या सर्वच देशांमध्ये व्हायला हवं, अस त्यांनी नमूद केलं. यावेळी श्रीमंत देशांमध्ये होत असलेल्या गर्दीवर देखील त्यांनी नाराजी व्यक्त केली. 'तुम्ही या देशांमध्ये कुठेही गेलात तर तुम्हाला गर्दी दिसेल. जणूकाही साथ नाहीच आहे. मग तुम्ही ज्या देशांमध्ये लसींचा पुरवठा पुरेसा झालेला नाही अशा देशांमध्ये जा. तिथे तुम्हाला लॉकडाउन दिसेल', असं टेड्रॉस यांनी सांगितलं.

### आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीत मिताली राजने रचला इतिहास!

तिने कसोटीत एक शतक आणि ४ अर्धशतकांच्या मदतीने ६६९ धावा केल्या आहेत. तिने एकदिवसीय सामन्यात ७ शतके आणि ५५ अर्धशतकांसह ७०९८ धावा आणि टी-२० क्रिकेटमध्ये १७ अर्धशतकांसह एकूण २३६४ धावा केल्या आहेत. एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यात ६ हजार धावा पूर्ण करणारी मिताली पहिली महिला क्रिकेटपटू आहे. तिच्यापाठोपाठ माजी इंग्लिश महिला क्रिकेटपटू चार्लोट एडवर्ड्सचे नाव आहे. तिच्या खात्यात ५९९२ धावा आहेत.

# प्रताप सरनाईकांबद्दल लवकरच बातमी मिळेल

## संजय राऊतांचं मोठं विधान



**मुंबई, दि. २६ ( प्रतिनिधी ) :** मनी लॉंड्रिंग प्रकरणामुळे अडचणीत सापडलेले शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांच्या पत्रामुळे शिवसेनेत खळबळ उडाली होती. पण, आता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सरनाईक यांच्याबद्दल निर्णय घेतला असून लवकरच बातमी कळेल, असं सूचक विधान शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केलं.

शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी आज राज्याचे मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांची मातोश्री निवास्थानी भेट घेतली. दुपारी १२.३० ते २.३० पर्यंत ही बैठक चालली. या बैठकीत राज्यातील अनेक मुद्यांवर चर्चा झाली. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, भाजपची जुळवून घ्या, असं पत्र लिहिणाऱ्या प्रताप सरनाईक यांच्याबद्दलही या बैठकीत चर्चा झाली.

'प्रताप सरनाईक यांच्या संदर्भात या बैठकीत चर्चा झाली, त्यांनी त्यांची भावना या पत्रात व्यक्त केली. सरनाईक हे आजन्म ते शिवसेनेतच राहतील असं ते म्हणाले. मी हे साहेबांनाही सांगितलंय. त्यामुळे प्रताप सरनाईक यांच्या संदर्भात लवकरच तुम्हाला एक बातमी मिळेल' असं राऊत म्हणाले. 'शिवसेना पक्षप्रमुख हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत. पण माझी आज चर्चा ही आमच्या पक्षप्रमुखांशी झाली. संघटनात्मक गोष्टींवर चर्चा झाली. पक्ष मजबूत असेल तर सरकार अधिक काळ टिकेल, मुख्यमंत्री आमचाच राहील. संघटनेचे कामं करणं गरजेचं आहे. विधानसभेचे अधिवेशन सुरू होतंय, त्या संर्भात मुख्यमंत्र्याचं त्यावर काम सुरू आहे' असं राऊत यांनी सांगितलं.

आज पक्षप्रमुखांची भेट घेतली चर्चा झाली. बाहेर चर्चा व्हावी असं विशेष काही नाही. सगळं स्थिर स्थावर आहे. महाराष्ट्राच्या विकासाविरोधात कोणी काहीही ढोल बडवले, तरी हे राज्य उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे, त्यांचा कार्यकाळ व्यवस्थित पूर्ण होईल. पवारांचा राजकीय मेसेज एवढाच आहे की महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उत्तम काम करत आहे. लोकांमध्ये त्यांची लोकप्रियता वाढतेय. त्यामुळे भविष्यात महाविकास आघाडीला त्याचा फायदा होईल' असंही राऊत म्हणाले. 'आज आम्ही त नाही आणि मध्ये सुद्धा नाही. यावर राष्ट्रीय स्तरावर एक आघाडी स्थापन करण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांचा दिसतोय, त्यामुळे जास्तीत जास्त प्रादेशिक पक्षांना विरोधी पक्षात सामावून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. पवार साहेबांची भूमिका काही असेल, तर ती योग्य आहे' असंही राऊत म्हणाले.

'कोणी म्हटलं तिसरी आघाडी स्थापन होतेय? एक भक्कम आघाडी पर्याय म्हणून उभी राहत असेल तर आमचे प्रमुख निर्णय घेतील.' असंही राऊत म्हणाले.

## मनसे उपविभाग अध्यक्ष पदी संदेश मोरे यांची निवड



**मुंबई, दि. २६ ( प्रतिनिधी ) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष राज ठाकरे यांनी आगामी मुंबई महानगर पालिकेची पूर्व तयारी सुरू केली असून अनेक प्रभागात सक्रिय कार्यकर्त्यांना पदावर बढती देऊन पक्ष बळकट करण्याची संधी दिली आहे. घाटकोपर विधानसभा क्षेत्रात ही नव्या नियुक्त्या करण्यात आल्या असून विद्यार्थी सेनेचे विभाग अध्यक्ष संदेश मोरे यांची प्रभाग क्रमांक १२६ आणि १२७ या प्रभागाकरिता उपविभाग अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार व विभाग अध्यक्ष गणेश चुक्कल यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रभाग क्रमांक १२६ व १२७ च्या उपविभाग अध्यक्ष पदी संदेश मोरे यांची नियुक्ती करून राज ठाकरे यांनी नुकतेच कृष्णकुंज येथे संदेश मोरे यांना नियुक्ती पत्र देऊन मिळालेल्या संधीचे सोने करून पक्ष वाढवाल अशी आशा व्यक्त केली. निष्ठावंत कार्यकर्त्याची उपविभाग अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल संदेश मोरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला आहे.

## वेगळी तारीख द्यावी, अनिल देशमुखांकडून ईडीला पत्र

**मुंबई, दि. २६ ( प्रतिनिधी ) :** १०० कोटी वसुली प्रकरणी राष्ट्रवादीचे नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. नागपूरमध्ये ईडीने धाडी टाकल्यानंतर आता अनिल देशमुख यांना चौकशीसाठी समन्स बजावण्यात आला आहे. शनिवारी सकाळी ११ वाजता चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश ईडीनं दिले होते. मात्र सकाळी ११ च्या सुमारास अनिल देशमुख नाहीतर त्याचे वकील जयवंत पाटील ईडी कार्यालयात हजर झाले.

अनिल देशमुख ईडीच्या कार्यालयात हजर राहणार नसून त्यांना नीट रितसर माहिती दिली जावी आणि पुढील वेगळी तारीख द्यावी, अशी मागणी करणारे पत्र वकील जयवंत पाटील यांनी ईडीला दिलं. आज देशमुख हे चौकशीला येणार नाहीत. आम्ही वेळ मागितली आहे. देशमुख यांना जे समन्स पाठवलं होतं त्याबद्दल आम्ही ईडी सांगितले आहे की, चौकशीमध्ये आम्हाला कोणत्या बाबतीत प्रश्न विचारले जातील या बद्दल माहिती द्या. काही कागतपत्रं द्या आणि थोडा वेळ द्या. मग देशमुख चौकशीला सामोरे जातील. तसे पत्र आम्ही दिले आहे.

शुक्रवारी अनिल देशमुख यांच्या नागपूरच्या निवासस्थानासह मुंबईतल्या ज्ञानेश्वरी, सुखदा या निवासस्थानी ईडीच्या पथकाने छापेमारी केली. ईडीच्या पथकाने मुंबईत अनिल देशमुखांच्या निवासस्थानी सात तासांहून अधिक काळ चौकशी केली. त्यानंतर देशमुख यांच्या दोन्ही स्वीय सहाय्यकांना अटक करण्यात आली आहे. कुंदन शिंदे आणि संजीव पालांडे अशी दोन्ही पीएची नावं आहेत. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी ही अटक करण्यात आली आहे.

मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंग यांनी लेटर बॉम्ब टाकत अनिल देखमुख यांच्यावर १०० कोटी रुपयांच्या वसुली करण्याचा आरोप केला होता. इतकेच नाही तर या संपूर्ण प्रकरणात संजीव पालांडे यांच्या नावाचाही उल्लेख झाला होता. अनिल देशमुख यांनी हे सर्व आरोप फेटाळले होते. मात्र, या प्रकरणावरुन गृहमंत्री अनिल देशमुख यांना आपल्या पदाचा राजीनामाही द्यावा लागला आहे.

## भारताच्या कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरणाने पार केला ३१ कोटींचा टप्पा

**मुंबई, दि. २६ ( प्रतिनिधी ) :** भारताच्या देशव्यापी लसीकरण अभियानाने काल ३१ कोटींचा मैलाचा टप्पा पार केला. आज सकाळी ७ वाजेपर्यंत उपलब्ध अहवालानुसार ४२,००,८३९ सत्रांमध्ये, एकूण ३१,५०,४५,९२६ लसींच्या मात्रा देण्यात आल्या आहेत. गेल्या २४ तासात ६१,१९,१६९ मात्रा देण्यात आल्या.

यात समावेश आहे: कोविड -१९ प्रतिबंधक लसीकरणाच्या नव्या टप्प्याला २१ जून २०२१ रोजी सुरुवात झाली आहे. देशभरात लसीकरणाचा वेग आणि व्याप्ती वाढवण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध आहे.

भारतात गेल्या २४ तासात ४८,६९८ नव्या रुग्णांची नोंद झाली.

सलग १९ दिवस १ लाखापेक्षा कमी दैनंदिन रुग्णांची नोंद झाली आहे. राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांच्या सातत्यपूर्ण आणि समन्वित प्रयत्नांचे हे फळ आहे.

भारतात सक्रीय रुग्णसंख्येतही सातत्याने घट होत आहे. देशात आज सक्रीय रुग्णसंख्या ५,९५,५६५ इतकी आहे. ८६ दिवसांनंतर रुग्णसंख्या ६ लाखांखाली गेली आहे.

गेल्या २४ तासात सक्रीय रुग्णसंख्येत एकूण १७,३०३ इतकी घट झाली असून सध्या देशात एकूण रुग्णसंख्येच्या केवळ १.९७म सक्रीय रुग्ण आहेत.

कोविड -१९ संसर्गातून मोठ्या प्रमाणावर रुग्ण बरे होत असल्याने सलग ४४ दिवशी भारतात नव्या रुग्णांपेक्षा बरे होणाऱ्यांची संख्या अधिक आहे. गेल्या २४ तासात ६४,८१८ रुग्ण बरे झाले आहेत. दैनंदिन नव्या रुग्णांच्या तुलनेत गेल्या २४ तासात जवळपास, १६,००० (१६,१२०) जण बरे झाले.

भारतात महामारीच्या सुरुवातीपासून ते आतापर्यंत एकूण २,९१,९३,०८५ तर गेल्या २४ तासात ६४,८१८ रुग्ण कोविड-१९ संसर्गातून बरे झाले आहेत.

रुग्ण बरे होण्याचा कल सातत्याने सकारात्मक असून आता रुग्ण बरे होण्याचा एकूण दर ९६.७२म झाला आहे.

चाचण्यांच्या क्षमतेत सातत्याने वाढ होत आहे. गेल्या २४ तासात देशात १७,३५,७८१ चाचण्या करण्यात आल्या. देशात आतापर्यंत एकूण ३९.७८ कोटींपेक्षा अधिक (३९,९५,६८,४४८) चाचण्या करण्यात आल्या आहेत.

देशात एकीकडे चाचण्या वाढत असून दुसरीकडे साप्ताहिक पॉझिटीव्हीटी दरात घट कायम आहे. सध्या साप्ताहिक पॉझिटीव्हीटी २.९७म तर दैनंदिन पॉझिटीव्हीटी २.७९म आहे. सलग १९ व्या दिवशी हा ५म पेक्षा कमी आहे.

## कांदिवली बनावट लसीकरण प्रकरण

## बोगस लस पुरवणाऱ्या डॉक्टर दाम्पत्याला अटक

**मुंबई, दि. २६ ( प्रतिनिधी ) :** ३० मे २०२१ रोजी मुंबईच्या कांदिवली परिसरातील हिरानंदानी हेरिटेज सोसायटीत एका बनावट लसीकरण शिबीराचं आयोजन करण्यात आलं होतं. याठिकाणी अनेकांना बनावट लशी देण्यात आल्या होत्या. या बनावट लसीकरण प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत एकूण १० जणांना अटक केली आहे. मुंबईकरांना बोगस लस टोचणाऱ्या टोळीचं कनेक्शन आता चारकोपपर्यंत पोहोचलं आहे. पोलिसांनी बोगस लशीचा पुरवठा करणाऱ्या डॉक्टर दाम्पत्यालाही चारकोपमधून अटक केली आहे.

डॉक्टर शिवराज पटारिया आणि त्यांची पत्नी नीता पटारिया अशी या आरोपी दाम्पत्याची नावं असून ते चारकोप येथील रहिवासी आहेत. अटकेत असणाऱ्या आरोपींची चौकशी करत असताना,



आरोपींनी चारकोप येथील पटारिया दाम्पत्य बोगस लस पुरवत असल्याची कबुली दिली आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोघांच्याही मुसक्या आवळल्या आहेत. आरोपींनी मुंबईतील जवळपास २ हजार ५३ नागरिकांना बनावट लस दिल्याची धक्कादायक माहिती चौकशीत समोर आली आहे. बनावट लसीकरण करणारी ही एकच टोळी असून, या टोळीनं मुंबईत तब्बल ९ वेगवेगळ्या ठिकाणी लसीकरण शिबीराचं आयोजन केलं होतं. पण तत्पूर्वी त्यांचं बिंग फुटलं आहे. त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे.

याप्रकरणी पोलिसांनी बनावट लसीकरणासाठी वापरण्यात आलेली टोयोटा कारही जप्त केली आहे. त्याचबरोबर या प्रकरणातीलदोन मुख्य आरोपी महेंद्र प्रताप सिंग आणि मनीष त्रिपाठी या दोघांची बँक खाती देखील गोठवण्यात आली आहेत. या दोन आरोपींनी आपल्या काही साथीदारांच्या मदतीनं मुंबईत बनावट लसीकरण कॅम्प आयोजित करून लुटीचं सत्र चालवलं होतं. पोलिसांनी या टोळीतील १० जणांना आतापर्यंत अटक करण्यात केली आहे.

तसेच २०० पेक्षा अधिक लोकांचे जवाबही नोंदवले आहेत. या आरोपींकडून पोलिसांनी १२ लाख ४० हजार रुपयांची रक्कम जप्त केली आहे. शिवाय ११४ लसीकरणाचे बनावट प्रमाणपत्रंही जप्त केली आहेत.

## 'सौ चुहे खाके बिल्ली हज को चली', जयंत पाटलांचा भाजपला सणसणीत टोला

**मुंबई, दि. २६ ( प्रतिनिधी ) :** स्थानिक स्वराज संस्थेत आरक्षण रद्द झाल्यामुळे राज्यभरात चक्का जाम आंदोलन करत आहे. पण, ओबीसी आरक्षणाबाबत भाजपचे आंदोलन म्हणजे 'सौ चुहे खाके बिल्ली हज को चली' असं काही आहे, असा सणसणीत टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी लगावला.

जयंत पाटील यांनी ट्वीट करून भाजपच्या आंदोलनाची एकाप्रकारे खिल्ली उडवली आहे. 'राज्यभरातील ओबीसी नेतृत्व ठरवून मोडीत काढणारा भारतीय जनता पक्ष आज राज्यभर ओबीसी आरक्षणासाठी आंदोलन करत आहे' अशी टीका जयंत पाटील यांनी केली.

तसंच, भाजपचे आजचे आंदोलन म्हणजे 'सौ चुहे खाके बिल्ली हज को चली' असंच काहीस आहे, असा टोलाही पाटील यांनी लगावला. तर दुसरीकडे राष्ट्रवादीचे नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी लोणावळयात सुरू असलेल्या ओबीसी आरक्षण परिषदेतून फडणवीस यांच्यावर धक्कादायक विधान केले आहे.

तुम्ही आंदोलन रस्त्यावर करत आहात,



त्याचे स्वागत आहे. फडणवीस यांनी हा विषय पंतप्रधान मोदींकडे न्यावा आणि समाजला न्याय द्यावा. सत्तेत असताना देवेंद्र फडणवीस यांनी जो अध्यादेश काढला होता. त्यावर सही करू नका असं भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी मला येऊन सांगितलं होतं, असा खुलासा छगन भुजबळ यांनी केला.

पाच वर्ष सगळी कामे करून घेतात. निवडणूक आली की म्हणतात ही माळी कुंभार वंजारी. आमचा मतदार संघ राखीव नाही त्याच कारण आमच्या मतदारसंघात कोणी उभे राहू शकतात, मतदारसंघात जाव लागते सगळ्यांना बरोबर घ्याव लागतं, हे ही समाजाने समजून घेतले पाहिजे, असंही भुजबळ म्हणाले. 'या राज्य सरकारमध्ये ओबीसी मंत्र्यांचे महत्व ताटातल्या चटणी, कोशिंबीर प्रमाणे आहे. मात्र हे मंत्री आपल्या राजकीय आकांच्या सांगण्यावरून तेच बोलतात. महाराष्ट्रात ज्या प्रकारे ओबीसी आरक्षणासाठी रस्त्यावर उतरले त्यामुळे एक तर आरक्षण द्यावे लागेल नाहीतर खुर्ची खाली करावी लागेल, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.

## आरक्षण हक्क कृती समितीचा आझाद मैदानात आक्रोश मोर्चा

**मुंबई, दि. २६ ( प्रतिनिधी ) :** अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या समूहाचे पदोन्नतीमधील आरक्षण संपवून ३३ टक्के आरक्षण संविण्याचे कटकारस्थान करणाऱ्या शासनाविरुद्ध निषेध नोंदविण्यासाठी आणि हे आरक्षण कायम ठेवण्यात यावे या मागणीसाठी आज आझाद मैदानात राज्यस्तरीय आरक्षण हक्क कृती समितीच्या वतीने आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चात राज्यभरातून विविध १२० कर्मचारी, अधिकारी सहभागी झाल्या होत्या अशी माहिती डॉ सुरेश माने यांनी दिली. ते पुढे म्हणाले देशातील सामाजिक आणि आर्थिक बाजू नष्ट करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध समूहासाठी लागू केलेले आरक्षण रद्द करून विविध जात समूहातील मागासवर्गीयांना पुन्हा गुलामीच्या जोखडात टाकण्याचा सरकारचा प्रयत्न दिसतो आहे. सरकारचा हा डाव आम्ही मोडीत काढू असा इशारा यावेळी आरक्षण हक्क कृती समितीच्या वतीने देण्यात आला. यावेळी सागर जगताप उपस्थित होते




**ZENITH FIBRES LIMITED**
CIN : L40100MH1989PLC054580
205, Marol Bhavan, 2nd Floor, Marol Co-Op. Indl. Estate Ltd., M.V. Road, J.B. Nagar Post, Andheri (E), Mumbai-400 059.Fax : 022-28599429/ Tel. : 022-28599428/ E-Mail : mumbai@zenithfibres.com,

**EXTRACT OF AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31ST MARCH, 2021**

(₹. in Lacs)

| Sr. No. | Particulars | Quarter Ending 31.03.2021 Audited | Quarter Ending 31.12.2020 Unaudited | Year Ending 31.03.2021 Audited | Nine Months Year Ending 31.03.2020 Audited |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 1145.38 | 565.21 | 2598.56 | 3037.32 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 53.67 | 40.89 | 93.12 | 260.98 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before Tax, (after Exceptional and/or Extraordinary items) | 53.67 | 40.89 | 93.12 | 260.98 |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after Tax, (after Exceptional and/or Extraordinary items) | 40.41 | 28.46 | 68.61 | 197.83 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income] | 31.32 | 28.46 | 59.52 | 191.34 |
| 6 | Equity Share Capital (Face value ₹ 10/- each) | 394.41 | 394.41 | 394.41 | 394.41 |
| 7 | Earnings per equity Share (of ₹ 10/- each) (Not annualised) | | | | |
| | (1) Basic(Rs.) | 1.02 | 0.72 | 1.74 | 4.89 |
| | (2) Diluted (Rs.) | 1.02 | 0.72 | 1.74 | 4.89 |

**Note :**
The above is an Extract of the detailed format of results for quarter and year ended on 31.03.2021 filed with the stock exchange under Regulation - 33 of the SEBI (Listing and Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and approved by Board on 26th June, 2021 . The format of the standalone quarterly results are available on the website of the stock exchange (www.bseindia.com) and the Company's website (www.zenithfibres.com)

Date : 26.06.2021
Place : Vadodara

**By Order of the Board of Directors**
**Sanjeev Rungta**
**DIN:00053602**
**Executive Chairman**